advt22

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,
**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

## कृषी विद्यापीठातील पदव्युत्तर पदवी प्रवेश सूचना २०२३-२४

राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरिता सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत केंद्रीय पध्दतीने राबविण्यात येत आहे.

**१) उपलब्ध विद्याशाखा**

| | |
|---|---|
| (१) एम्.एस्सी.(कृषी) | (२) एम्.एस्सी.(उद्यानविद्या) |
| (३) एम्.एस्सी. (वनशास्त्र) | (४) एम्.एफ्.एस्सी. (मत्स्यशास्त्र) |
| (५) एम्. टेक्. (अन्नतंत्र) | (६) एम्.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) |
| (७) एम्. टेक्. (कृषी अभियांत्रिकी) | (८) एम्. एस्सी. (गृहविज्ञान) |
| (९) एम्. बी. ए. (कृषी) | (१०) एम्.एस्सी. (काढणी पश्चात तंत्रज्ञान) |

पात्रता, महाविद्यालये, प्रवेश क्षमता, जागांचे आरक्षण इत्यादीविषयक अधिक माहितीसाठी सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश माहिती पुस्तिकेचे अवलोकन करावे. सदरची प्रवेश माहिती पुस्तिका **www.mcaer.org** किंवा **https://maha.agriadmissions.in** या संकेतस्थळांवर **दि. ०७ ऑगस्ट,२०२३ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे.**

**२) प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती-**

- वरील कोणत्याही अभ्यासक्रमाकरिता प्रवेशोच्छुक उमेदवारांनी https://maha.agriadmissions.in या संकेतस्थळाद्वारे दि. २० ऑगस्ट,२०२३ पर्यंत ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल करावा.
- उमेदवाराने त्याची स्वाक्षरी, पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र आणि आवश्यक ती संबंधित कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावीत.
- उमेदवाराने प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे हातबटवडयाने / टपालाने / कुरीअरने पाठवू नयेत.
- प्रवेश अर्जाचे शुल्क डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड / नेट बँकीगद्वारे भरावे.

**३) प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरावयाचे शुल्क-**

खुल्या प्रवर्गासाठी रु. १५००/-
आरक्षित प्रवर्गासाठी रु. ७५०/- (दिव्यांग, अनाथ) आणि (अ.जा., अ.ज., वि.जा*, भ.ज*, इ.मा.व*, वि.मा.व*., आर्थिक दुर्बल घटक)
[आर्थिक दुर्बल घटक वगळता जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य. तसेच *उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य.]

क्र. मकृप/शिक्षण-१/४९२३/2996
दिनांक-03 ऑगस्ट,२०२३

(रावसाहेब भागडे)
**महासंचालक**
महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे